पुण्य नगरी

# टीसीआयची २५० कोटींच्या भांडवली खर्चाची सज्जता

**मुंबई** : ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (टीसीआय) पुढील वित्तीय अर्थात आर्थिक वर्ष २३ साठी सुमारे २५० कोटी रुपयांच्या भांडवली खर्चाची सज्जता करण्याची योजना आखत असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. एकूण कॅपेक्स (भांडवली खर्च) पैकी १००-१२५ कोटी रुपये जहाजे आणि कंटेनर्सवर खर्च केला जाईल. कंपनी आपल्या टॉप लाइनमध्ये १२-१५ टक्क्यांची तर बॉटम लाइनमध्ये २० टक्क्यांच्या वाढीची अपेक्षा आहे. याबाबत टीसीआयचे व्यवस्थापकीय संचालक विनीत अगरवाल म्हणाले, पुढील आर्थिक वर्षामध्ये आमचा भांडवली खर्च सुमारे २५० कोटी रुपयांचा राहील अशी अपेक्षा आहे. यापैकी १००-१२५ कोटी रुपये जहाजे व कंटेनर्ससाठी खर्च केले जातील आणि अर्थातच काही रक्कम कदाचित ३०-५० कोटी रुपये ट्रक्सवर खर्च केले जातील. शिवाय आम्ही गोदामे उभारण्यासाठीही खर्च करणार आहोत. त्यासाठी सुमारे ७५ कोटी रुपयांचा खर्च येईल.

सध्या पायाभूत सोयीसुविधांमध्ये होत असलेली वाढ पाहिली तर ती बहुमार्गी असल्याचे दिसून येईल. त्यातून आमच्या रेल्वे व्यापार आणि समुद्री मार्ग व्यापाराला चालना मिळू शकेल. ग्राहकांच्या मागणीमध्ये बदल होत असल्याचे आम्हाला दिसत आहे. सर्वसाधारण मालवाहतूक तर सुरूच आहे. आमचा रेल्वे वाहतूक व्यापारही तुलनेने चांगला चालला आहे. तेव्हा, बाजारात येऊ घातलेल्या तेजीचा फायदा घेण्यास आम्ही बऱ्यापैकी सुसज्ज आहोत, असा या सगळ्याचा अर्थ आहे.